
**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।




उपक्रमाची सुरुवात इ.स. १९७९ । संपादक : कै. द्वा. वा. केळकर

श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड संचालित

# श्रीमद् ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्राद्वारा/ई-मेलद्वारा)

## प्रवेश - परिचय - प्रबोध प्रश्नपत्रिका संच


'श्री.दा.अ.', श्रीसमर्थ सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग,
एरंडवणा, पुणे - ४११००४. मो. +९१ ८६६९४ ०५९७१
E-mail : dasbodh.abhyas@gmail.com । Web : www.dasbodhabhyas.org



किंमत ₹.३०

**पत्रद्वारा/ईमेलद्वारा अभ्यासक्रमाची माहिती :** २१ वर्षावरील कोणासही या उपक्रमात प्रवेश दिला जातो. नवीन अभ्यासार्थींना जानेवारी ते १ मार्च पर्यंत प्रवेश दिला जातो. यातील पहिली प्रश्नपत्रिका सोडवून तो स्वाध्याय आपल्या विभागाच्या केंद्रप्रमुखांकडे पाठवावा.

**स्वाध्याय कोठे पाठवावा :** आपण ज्या विभागात रहातो त्यासाठी असलेल्या केंद्राकडेच पहिला स्वाध्याय पाठवावा. उत्तरासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीटच पाठवावे. खालीलपैकी योग्य केंद्राचा पत्ता लिहून स्वाध्याय पाठवावा. सोबत प्रवेशपत्रिका सोडवून, फॉर्म भरून लिहून पाठवावी. डाव्या कोपऱ्यात प्रेषकाने स्वतःचा पत्ता लिहावा.

| **पत्रद्वारे श्री दासबोध अभ्यास कार्यालय आणि जिल्हा व केंद्र-संचालकांचे पत्ते**<br>श्रीसमर्थ सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे ४ **मो. ८६६९४०५९७१.** | |
|---|---|
| १. जिल्हा पुणे, अहमदनगर बृहन् महाराष्ट्र, विदेश | **श्री. सुहास क्षीरसागर,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.' श्रीसमर्थ सोसायटी, धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे ४. |
| २. जिल्हा संपूर्ण मुंबई-महानगर व नवी मुंबई | **श्री. संतोष नारायण सप्रे,** केंद्रसंचालक,'श्री.दा.अ.' ए ४०१,नवगुरूकृपा, केसरबाग,मुलुंड, (पूर्व) मुंबई ४०००८१. मो.९९७५१३२२३४ **शिवाय वर्षभर केव्हाही प्रवेश** |
| ३. जिल्हा रायगड, ठाणे, पालघर, | **सौ. नीलम जोशी,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.',२०१, आदित्यवैभव, श्रीगजाननमहाराज मंदिरासमोर, कुळगाव, बदलापूर (पूर्व) जि. ठाणे ४२१५०३ फोन : ०२५१-२६९१२२४ मो, ०९८५०८२९९३४ |
| ४. जिल्हा सातारा, सोलापूर | **श्री. अनंत विश्वनाथ बोधे,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.' ए १०, आण्णा नांगरे नगर, कृष्णा कॅनॉल, विद्यानगर, कराड, जि. सातारा ४१५१२४. मो. ०९६०४४३३५२३. **शिवाय वर्षभर केव्हाही प्रवेश** |
| ५. जिल्हा जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार. | **डॉ. सुरेश रामदास पाठक,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.', 'स्वामीकृपा', ५६, प्रधानपार्क, दुसरा मजला, म.गांधी रोड, नाशिक ४२२००१. फोन : (०२५३) २५८०३८३ मो. ०९८६०४१९०१७. |
| ६. जिल्हा औरंगाबाद, बीड, जालना,परभणी,हिंगोली, नांदेड,उस्मानाबाद, लातूर | **सौ.मानसी याडकीकर,** केंद्रसंचालक 'श्री.दा.अ.', गोकुळ खडकेश्वर, जनावर दवाखान्यासमोर, औरंगाबाद ४३१००१. मो. ९७३०००५०६३. **शिवाय वर्षभर केव्हाही प्रवेश** |
| ७. जिल्हा वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली | **श्री. रमेश वासुदेव फडके,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.', १बी, दामोदर हौसिंग लेआऊट, आर.पी.टी.एस. रोड, सुरेंद्रनगर, विवेकानंद पोस्ट, नागपूर ४४००१५ मो. ०९८५००७०४३४ |
| ८. जिल्हा सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी | **सौ. ज्योती कोरबु,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.', कल्याण कुटी, प्लॉट नं.१५, पद्मावती नगर, धामणी रोड, सांगली ४१६४१६ फोन : (०२३३) २३०१४२४ मो. ०९४२२६१८२०३/०६८०१७२०३ |
| ९. जिल्हा अकोला,बुलढाणा अमरावती, यवतमाळ, वाशिम | **श्री. प्रदीप गणोरकर,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.' मूर्तिजापूर, पटवारी कॉलनी, भक्तिधाम मंदिराजवळ, जि. अकोला ४४४१०७. मो. ८२७५७२९१२९. |
| १०. संपूर्ण गोमांतक राज्य, | **श्री. सुरेश तळावलीकर,** केंद्रसंचालक 'श्री.दा.अ.', ६१७, मातृछाया, आनंदनगर, पोस्ट : फातोर्डा, सिंधूदुर्ग, गोवा ४०३६०२. मो. ७७०९७८६६८६/८२०८२८८६४१ |
| ११. ई-मेल द्वारे | **श्री. सुहास क्षीरसागर,** केंद्रसंचालक, 'श्री.दा.अ.' मो. ०९८८१४७६०२०. dasbodh.abhyas@gmail.com **शिवाय वर्षभर केव्हाही प्रवेश** |

प्रस्तावना

## दासबोध प्रवेश


प्रश्नपत्रिका १ ली - (दासबोध दशक १ समास १ ‘ग्रंथारंभलक्षण’ वर आधारित) ७

प्रश्नपत्रिका २ री - (दशक १२ समास १ ‘विमळलक्षण’वर आधारित) ७

प्रश्नपत्रिका ३ री - (दासबोध दशक १२ समास २ ‘प्रत्ययनिरूपण’ वर आधारित) ८

प्रश्नपत्रिका ४ थी - (दासबोध दशक २ समास २ रा ‘उत्तमलक्षण’ यावर आधारित) ९

प्रश्नपत्रिका ५ वी - (दासबोध दशक ११, समास ३ ‘सिकवणनिरूपण’वर आधारित) ९

प्रश्नपत्रिका ६ वी - (दासबोध दशक ४ समास ३ ‘नामस्मरणभक्ति’ वर आधारित) १०

प्रश्नपत्रिका ७ वी - (दासबोध दशक १२, समास ९ ‘येत्नसिकवण’वर आधारित) ११

प्रश्नपत्रिका ८ वी - (दासबोध दशक १२, समास १० ‘उत्तमपुरुषनिरूपण’वर आधारित) १२

प्रश्नपत्रिका ९ वी - (दासबोध दशक १८, समास ६ ‘उत्तमपुरुषलक्षण’वर आधारित) १२

प्रश्नपत्रिका १० वी - (दासबोध दशक १९ समास १० वा ‘विवेकलक्षणनिरूपण’ वर आधारित) १३

प्रश्नपत्रिका ११ वी - (दासबोध दशक १४ समास ६ वा ‘चातुर्यलक्षण’ वर आधारित) १३

प्रश्नपत्रिका १२ वी - (दासबोध दशक २० समास १० ‘विमलब्रह्मनिरुपण’वर आधारित) १४


## दासबोध परिचय


प्रश्नपत्रिका १ ली - (दासबोध द. १८ स. ४ ‘‘देहदुर्लभनिरूपण’’वर आधारित) १६

प्रश्नपत्रिका २ री - (दासबोध द. ३ स्वगुणपरिक्षा २(अ), ३(ब), ४(क) व ५(ड) वर आधारित) १६

प्रश्नपत्रिका ३ री - (दासबोध द. २ स. १ मूर्खलक्षण आणि द. २ स. १० पढतमूर्खलक्षण वर आधारित) १६

प्रश्नपत्रिका ४ थी - (दासबोध द. २ मधील स. ५-रजोगुणलक्षण, ६-तमोगुणलक्षण व ७-सत्त्वगुणलक्षण यावर आधारित) १७

प्रश्नपत्रिका ५ वी - (दासबोध दशक २ मधील समास ८-सद्विधानिरूपण आणि ९-विरक्तलक्षण वर आधारित) १८

प्रश्नपत्रिका ६ वी - (दासबोध द. ११ स. १०-नि:स्पृह वर्तणूक आणि द. १५ स. २नि:स्पृहव्याप वर आधारित) १८

प्रश्नपत्रिका ७ वी - (दासबोध द. ३ मधील स. ६-आध्यात्मिक ताप, ७-आधिभौतिक ताप आणि ८-आधिदैविक ताप यांवर आधारित) १९

| | | |
|---|---|---|
| प्रश्नपत्रिका ८ वी | - (दासबोध द. ४ स. ४-पादसेवन-भक्ती, ५-अर्चनभक्ती आणि ६-वंदनभक्ती वर आधारित) | २० |
| प्रश्नपत्रिका ९ वी | - (दासबोध द. ८ स. ६-दुश्चीतनिरूपण वर आधारित) | २० |
| प्रश्नपत्रिका १० वी | - (दासबोध द. ११ स. ५-राजकारण निरूपण आणि द. १९ स. ९-राजकारण निरूपण वर आधारित) | २१ |
| प्रश्नपत्रिका ११ वी | - (द. १८ स. ७-जनस्वभाव निरूपण आणि १८ स. ८-अंतर्देव निरूपण वर आधारित) | २१ |
| प्रश्नपत्रिका १२ वी | - (दासबोध दशक ९ समास ४ ''जाणपणनिरुपण'' वर आधारित) | २२ |


## दासबोध प्रबोध


| | | |
|---|---|---|
| प्रश्नपत्रिका १ ली | - (द. १-१ ग्रंथारंभलक्षण आणि द. २०-१० विमळब्रह्मनिरूपण वर आधारित) | २३ |
| प्रश्नपत्रिका २ री | - (द. ११-६, महंत लक्षण, १४-१ निस्पृह लक्षण, १८-३ निस्पृहसिकवण वर आधारित) | २३ |
| प्रश्नपत्रिका ३ री | - (द. १४-६ चातुर्यलक्षण, १५-१ चातुर्यलक्षण, १५-६ चातुर्यविवरण; वर आधारित) | २४ |
| प्रश्नपत्रिका ४ थी | - (श्रवणमाहात्म्य : द. ७-८ श्रवणनिरूपण, ७-९ श्रवणनिरूपण, १७-३ श्रवणनिरूपणवर आधारित) | २४ |
| प्रश्नपत्रिका ५ वी | - (द. १६-९ नाना उपासनानिरूपण, १६-१० गुणभूतनिरूपण, १७-५ अजपानिरूपण, वर आधारित) | २५ |
| प्रश्नपत्रिका ६ वी | - (द. ५-७-बद्धलक्षण, ५-८-मुमुक्षुलक्षण आणि ५-९-साधकलक्षणनिरूपण वर आधारित) | २५ |
| प्रश्नपत्रिका ७ वी | - (द. ४-७ दास्यभक्ती, ४-८ सख्यभक्ती, ४-९ आत्मनिवेदनभक्ति वर आधारित) | २६ |
| प्रश्नपत्रिका ८ वी | - (द. १-९ परमार्थस्तवन, १३-७ प्रत्ययेविवरण, १९-७ येत्ननिरूपण वर आधारित) | २६ |
| प्रश्नपत्रिका ९ वी | - (द. १२-४ विवेकवैराग्यनिरूपण, १२-५ आत्मनिवेदन, १३-१ आत्मानात्मविवेक वर आधारित) | २७ |
| प्रश्नपत्रिका १० वी | - (द. १-४ सद्गुरुस्तवन, १-५ संतस्तवन, ८-९ सिद्धलक्षण वर आधारित) | २८ |
| प्रश्नपत्रिका ११ वी | - (द. १८-५ करंटपरीक्षा निरूपण, १९-३ करंटलक्षण निरूपण, १९-४ सदेव (भाग्यवान)लक्षण निरूपण वर आधारित) | २८ |
| प्रश्नपत्रिका १२ वी | - (द. २०-४ आत्मानिरूपण, २०-५ चत्वारजिनस निरूपण, २०-८ देहेक्षेत्रनिरूपण वर आधारित) | २९ |

# प्रस्तावना

अभ्यासार्थी बंधू-भगिनींनो,

१९७८ मध्ये 'सज्जनगड' मासिकाच्या माध्यमातून ''पत्राद्वारा दासबोध अभ्यास'' या उपक्रमाची सुरुवात झाली. 'सज्जनगड' मासिकाच्या नोव्हेंबर १९७८ च्या अंकात प.दा.अ. उपक्रमाचा पहिला लेख प्रसिद्ध करण्यात आला. त्यामध्ये एका समासावर ५ प्रश्न काढले होते. पुढे प्रत्येक महिन्याला 'सज्जनगड' मासिकात प्रश्नपत्रिका प्रसिद्ध होऊ लागली व १७६ अभ्यासार्थींनी पहिल्या वर्षाचा अभ्यास यशस्वीरित्या पूर्ण केला. या सर्व अभ्यासार्थींना २६ डिसेंबर १९७९ रोजी गडावर श्री समर्थांच्या समाधीजवळ 'प्रशस्तीपत्रक' प्रदान करण्यात आली. यानंतर प.दा.अ. उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षास सुरुवात झाली व पुढे १९८० मध्ये तिसऱ्या वर्षाची सुरुवात झाली. अभ्यासार्थींची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली व 'दासबोध प्रवेश', 'दासबोध परिचय' व 'दासबोध प्रबोध' ही पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. पुढे प्रत्येक स्तरासाठी 'समीक्षकांचा मार्गदीप' ही पुस्तके तयार करण्यात आली. यानंतर अभ्यासार्थींच्या सोईसाठी प्रत्येक ओवी खाली त्या त्या ओवीचा भावार्थ असलेली पुस्तके तयार करण्यात आली.

आता असा विचार पुढे आला की, अभ्यासार्थींना तीन वर्षांची तीन पुस्तके देण्याऐवजी अभ्यासार्थी प्रवेश घेतो त्याचवेळी त्याला दासबोध ग्रंथ व त्याबरोबर तीन वर्षांसाठीच्या प्रश्नपत्रिका का देऊ नयेत? त्या निमित्ताने अभ्यासार्थींकडे दासबोध पोचेल व तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्याला संपूर्ण दासबोधाचा अभ्यास करणे किंवा दासबोधाचे पारायण करणे शक्य होईल. तसेच या उपक्रमात जर तीन वर्षांनंतरचा पुढील अभ्यासक्रम तयार झाला तर कोणतेही पुस्तक न घेता तो अभ्यास पूर्ण करणे शक्य होईल. तसा अभ्यासक्रम बनविण्याचा विचार चालू आहे.

आम्ही ही कल्पना समर्थ सेवा मंडळापुढे मांडली व समर्थ सेवा मंडळाने समर्थ भक्त बाबा बेलसरेंनी लिहिलेला दासबोधच स्वस्त किंमतीत देण्याची ग्वाही दिली व आता हा दासबोध तयार झालेला आहे. याबद्दल आम्ही सेवा मंडळाचे ऋणी आहोत. त्यामुळे आता अभ्यासार्थींना प्रवेशाच्या वेळीच हा दासबोध उपलब्ध होणारअहे. 'दासबोध' घराघरा पर्यंत पोचला पाहिजे हे अप्पांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

समर्थ सेवा मंडळाच्या भक्कम आधारानेच प.दा.अ.ची सुरुवात झाली व त्याच आधाराने श्री. दा. अ. ची वाटचाल व्यवस्थितरित्या चालू आहे व पुढेही राहणार आहे. आपण सर्वजण श्री. दा. अ. च्या माध्यमातून समर्थ सेवा मंडळाच्या कार्यात खारीचा वाटा उचलण्याचे काम करीत आहेत. ही एक 'समर्थ सेवाच' आहे. आपणा सर्वांना समर्थ कृपा प्राप्त होवो ही समर्थ चरणी प्रार्थना करतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

**वि. म. गाडगीळ**

अध्यक्ष

श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन

(पत्राद्वारा/ईमेलद्वारा)

## ।। आरती दासबोधाची ।।

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला । श्रुतिशास्त्रग्रन्थगीता साक्ष संगम केला।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला । अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला।।१।।
जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा।। आरति वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा।।धृ०।।
नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी । चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी। बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी।।२।।
वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे । नित्यनेम विवरितां स्वयें ब्रह्मचि होये।
अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे । 'कल्याण' लेखकाचें भावगर्भ हृदईं ।।३।।

## ।। आरती श्रीसमर्थांची ।।

आरती रामदासा । सद्‌गुरु सर्वेशा । कायावाचामनोंभावें । वोवाळूं परेशा ।।१।।
रामदास मूर्तिमंत। रामचंद्र अवतार । कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ।।२।।
वैराग्य भक्ति ज्ञान। शांति क्षमा विरक्ती । विवेक सालंकृत । क्षमा दया सर्वभूतीं ।।३।।
सच्चिदानंदघन। रामदास केवळ । दिनकरकृपायोगें । 'रामचंद्र' निर्मळ ।।४।।

## ।। जनकल्याण कारिणी ।।

समर्थ रामदासकृत श्रीरामप्रार्थना

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ।।धृ।।
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातिं घरी ।।१।।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंचि सांवरी ।।२।।
कठीण त्यावरी कठीण जालें । आतां न दिसे उरी ।।३।।
कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ।।४।।
दास म्हणे आम्ही केले पावलों । दयेसि नाही सरी ।।५।।

।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु।।

।। जय जय रघुवीर समर्थ।।

# दासबोध प्रवेश : प्रश्नपत्रिका १ ली

## (दासबोध दशक १ समास १ 'ग्रंथारंभलक्षण' वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्यात गाळलेल्या जागा भरा.

१) नाना --- -- संमती। ----- वेदांत श्रुती। आणि मुख्य -----। शास्त्रेंसहित।।

२) नाना धोके -----। नाना किंत -----। नाना ----- संसाराचे। नासती श्रवणें ।।

३) ----- योगें देव। निश्चयें पावती -----। ऐसा आहे -----। ईये ग्रंथी।।

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा. चूक असल्यास विधान बरोबर करून लिहा.

अ) दासबोध ग्रंथाला फक्त भगवद्गीतेचा आधार आहे.

ब) फक्त आत्मप्रचीतीच्या आधारावर दासबोध समर्थांनी लिहिला.

क) पूर्ण ग्रंथ वाचल्यानंतरच एखाद्या ग्रंथावर टीका करण्याचा अधिकार वाचकाला असतो.

प्र. ३ दासबोध ग्रंथाची फलप्राप्ती सांगणाऱ्या दहा ओव्यांचा फक्त क्रमांक लिहून अर्थ सांगा.

प्र. ४ पुढील ओव्यांच्या अर्थाचे स्पष्टीकरण थोडक्यात करा.

१) अमृत सेवितांच पावला। मृत्य राहो।।

२) जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा।।

प्र. ५ अ) दासबोधाचे वाचन आपण यापूर्वी केले आहे का? या ग्रंथाचा संकल्प आपणास का करावासा वाटतो; याबद्दल सुमारे दहा ओळी लिहा.

किंवा

दासबोधाचे वाचन यापूर्वी आपण केले त्यावेळी आपणास कोणता समाधानदायी अनुभव आला हे सुमारे दहा ओळीत लिहा.

# प्रश्नपत्रिका २ री

## (दशक १२ समास १ 'विमळलक्षण'वर आधारित)

प्र. १ प्रपंच न करता केवळ परमार्थ केला तर सर्वसामान्य माणसावर कोणत्या आपत्ती येतात? याउलट केवळ प्रपंचच केला तर कोणत्या आपत्ती येतात असे समर्थांनी म्हटले आहे?

प्र. २ प्रपंच व परमार्थ, दोन्हीमध्ये यश मिळण्यासाठी कोणता एक विशेष गुण येथे सांगितला आहे?

प्र. ३ या उताऱ्यामध्ये कोणते उर्दू शब्द समर्थांनी उपयोजिले आहेत?

प्र. ४ खालील दोन अवतरणांवर पाच ओळी स्पष्टीकरण करा –

१) 'जीवसृष्टी विवेकें चाले'

२) 'प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।'

प्र. ५ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) सुखी असतो -----। दु:खी होतो -----।।

२) संसारी असतां -----। तोचि जाणावा -----।

३) म्हणौन -----। धन्य तयाचें महिमान। जनीं राखे -----। तोचि येक।।

## प्रश्नपत्रिका ३ री

### (दासबोध दशक १२ समास २ 'प्रत्ययनिरूपण' वर आधारित)

प्र. १ 'अ' स्तंभामध्ये ओवीच्या चरणाचा पूर्वार्ध दिला आहे आणि 'ब' स्तंभामध्ये उत्तरार्ध दिला आहे. त्यावरून योग्य जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| १) अचूक येत्न करवेना। | १) तंव तो सुगंध कळेना। |
| २) जंवरी चंदन झिजेना। | २) अंतरपरीक्षा नेणती। |
| ३) पेरिलें तें उगवतें। | ३) त्यास मानिती लहानथोरें। |
| ४) आपणास आहे मरण। | ४) म्हणौन केलें तें सजेना। |
| ५) लोक नाना परीक्षा जाणती। | ५) म्हणौन राखावें बरेंपण। |
| ६) बोलतो खरें चालतो खरें। | ६) उसिणें द्यावें घ्यावें लागतें। |

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा. (चूक असल्यास बरोबर विधान करा) आधारासाठी ओवी लिहा.

१) जगात एकजण सुखी तर दुसरा दु:खी असतो व याला कारण त्याचे प्रारब्ध!

२) लोकांनी आपणास सज्जन म्हणावे यासाठी लोकांचा उपद्रवही सोसावा लागतो.

३) माणसाचे सद्गुण निदर्शनास आल्यावरही जगाचे अंत:करण त्याच्याबद्दल निवळू शकत नाही.

४) दुसऱ्याला नावे ठेवायची आणि आपली तरफदारी करायची ही सामान्य लोकांची लक्षणेच आहेत.

५) माणसाच्या बोलण्यावरून त्याची मन:स्थिती दक्ष माणसाला अजमावता येते.

प्र. ३ अ) सर्वसामान्य माणसाच्या वासना व कल्पना कशा स्वरूपाच्या असतात?

ब) माणसाला अपयश येण्याचे मुख्य कारण समर्थांच्या मते कोणते?

प्र. ४ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) जो आपला ---- नेणे। तो ---- काये जाणे। ---- सांडितां दैन्यवाणे। ---- लोक।।

२) ---- जे मानेना। तेथे ---- राहावेना। ---- तोडून जावेना। कोणीयेकें।।

३) ---- आहे मरण। म्हणौन राखावें ----। कठीण आहे ----। ----।।

प्र. ५ (दा. १२-२) या समासामधील तीन ओव्यांचा एक मोठा तक्ता करून स्वत:च्या घरी लावावयाचा आहे अशी इच्छा असल्यास त्यातील कोणत्या तीन ओव्यांची निवड आपणास करावीशी वाटेल?

## प्रश्नपत्रिका ४ थी

### (दासबोध दशक २ समास २ रा 'उत्तमलक्षण' यावर आधारित)

प्र. १ अ) पुढील अर्थ ज्या ओव्यांच्या चरणात सामावला आहे त्या संपूर्ण ओव्या लिहा.

१) सत्याची वाट विवेकाच्या जोरावर पक्की धरून ठेवावी.

२) धूम्रपान आणि मादक पदार्थ सेवन करू नये.

३) परस्त्रीकडे पापी दृष्टीने पाहू नये.

४) विद्या प्राप्त करणे आणि तिची उजळणी करणे केव्हाही सोडून येऊ नये.

५) सतत कष्ट करण्याची पाळी आली तरी त्याचा त्रास मानू नये.

ब) कोणत्या हेतूने समर्थांनी उत्तम लक्षणे या समासात सांगितली आहेत?

प्र. २ एखाद्या सभेमध्ये गेल्यास वक्ता किंवा श्रोता या नात्याने आपण कोणते नियम पाळले पाहिजेत, असे या समासांत सांगितले आहे?

प्र. ३ पुढील चरणांचा अर्थ स्पष्ट करा.

१) प्रीतीवीण रुसों नये। चोरास वोळखी पुसों नये।

२) बोलिला बोल विसरों नये। प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये।

३) वैरियांस दंडूं नये। शरण आलियां।

प्र. ४ पुढील बाबतीत समर्थांचा उपदेश एका वाक्यात लिहा.

१) आपला आहार व निद्रा २) आपली वस्त्रे ३) आपले बोलणे ४) आपले द्रव्यार्जन

प्र. ५ 'या समासामधील समर्थांचा उपदेश, ऐहिक आणि पारमार्थिक दोन्ही स्वरूपाचा आहे' हे विधान स्पष्ट करा. (मर्यादा १० ओळी)

## प्रश्नपत्रिका ५ वी

### (दासबोध दशक ११, समास ३ 'सिकवणनिरूपण'वर आधारित)

प्र. १ गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) ऐक ----- लक्षण। ----- जाऊ नेदी येक क्षण। ----- ज्ञान। बरें पाहे।।

२) ज्या ज्याचा जो -----। तेथें असावें -----।

३) याकारणें -----। ----- असावें मन। तरी मग ----- भोजन। गोड -----।।

प्र. २ अ) सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे चित्र या समासाच्या पहिल्या ३, ४, ५ आणि ६ व्या ओवीत समर्थांनी कसे रेखाटले आहे? अशा माणसाला ७ व्या ओवीत कोणते विशेषण त्यांनी लावले आहे?

ब) आळस या दुर्गुणाची निंदा समर्थांनी कशी केली आहे?

प्र. ३ अ) पुढील अर्थ ज्या ओव्यांमध्ये अगर ओवीच्या चरणामध्ये आहे, त्या संपूर्ण ओव्या लिहा.

१) जे आहे ते सारे देवाचे, अशी निश्चयाची वागणूक ठेवली असता, मनुष्याचा उद्वेग समूळ नष्ट होतो.

२) भोजन गोड लागावे यासाठी देखील मन एकाग्र असावे लागते.

३) निदान यापुढे तरी विवेकाने वागावे आणि इहपरलोक सिद्धीस न्यावे.

ब) प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीमध्ये आपल्या शिष्यांना सुयश लाभावे अशी समर्थांची दृष्टी होती, हे सिद्ध करणारा हा महत्त्वाचा समास आहे, असे आपणास वाटते काय? सुमारे दहा ओळीत आपले मत मांडा.

प्र. ४ तीनशे वर्षांपूर्वीच्या काळात वावरणाऱ्या समाजापुढे समर्थांनी एक आदर्श दिनक्रम ठेवला. त्यातील कोणता भाग आजही ग्राह्य आहे?

प्र. ५ पुढील प्रश्नांवरून आपली अभ्यासपद्धती समजून घेण्याची आमची इच्छा आहे. तरी कृपया माहिती द्यावी.

१) प्रश्नपत्रिका वाचताच लगेच सोडवावयास घेता की प्रश्न वाचून पुन्हा समास अनेकदा वाचून आपण उत्तरे लिहिता?

२) समासातील विचारांचा अभ्यास व्हावा म्हणून एखादी स्वतंत्र वही ठेवून त्यात काही महत्त्वाच्या ओव्या लिहिता का?

३) ओवी वाचल्यानंतर लगेच तिचा अर्थ वाचता की सर्व समास वाचल्यानंतरच अर्थाचे वाचन करता?

४) आपण लिहून काढलेली प्रश्नोत्तरे दुसऱ्या कोणाला वाचून दाखविता?

५) एकदा लिहिलेली उत्तरपत्रिका स्वत:लाच समाधानकारक वाटली नाही म्हणून पुन्हा लिहिता का?

## प्रश्नपत्रिका ६ वी

### (दासबोध दशक ४ समास ३ ‘नामस्मरणभक्ति’ वर आधारित)

प्र. १ संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. (लेखनमर्यादा प्रत्येकी ५ ओळी)

अ) नामें पाषाण तरले। ब) हळाहळापासून सुटला। प्रत्यक्ष चंद्रमौळी।।

प्र. २ 'अ' स्तंभातील शब्दसमुहापुढे 'ब' स्तंभातील योग्य नाव लिहून जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| नामाचा महिमा लोकांना सांगणारे | वाल्मिकी |
| उफराटे नाम घेणारे | अजामेळ |
| नामाने पावन झालेले | विश्वेश्वर |
| नाना आघातातून मुक्त | प्रल्हाद |

प्र. ३ सामान्य माणसाला एखादा मुद्दा पटवून देण्यासाठी खूपच तपशील सांगण्याची समर्थांची पद्धती या समासात आपणास कोठे दिसते? उदाहरणासहित स्पष्ट करा.

प्र. ४ नामस्मरणाने प्राप्त होणाऱ्या फलस्वरूप पाच गोष्टींचा उल्लेख करा.

प्र. ५ अ) गाळलेल्या जागी शब्द भरा.

१) --- नामामध्यें --- येक। म्हणतां होतसे ---। नाम स्मरतां ---। होईजे स्वयें।।

२) ----- स्मरे निरंतर। तें जाणावें -----। महादोषाचे -----। ----- नासती।।

३) ----- संकटें -----। ----- विघ्नें -----। ----- नामस्मरणें -----। ---।।

ब) सर्व जीवनभर केवळ रामनामस्मरणाचा प्रसार करणाऱ्या आधुनिक काळातील एका संताचे नाव सांगा. त्यांच्या उपदेशाचा कोणता ग्रंथ आपण वाचला आहे?

## प्रश्नपत्रिका ७ वी

### (दासबोध दशक १२, समास ९ 'येत्नसिकवण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ज्या ओव्या वरील समासांत आहेत त्या लिहा.

१) प्रत्येक माणसाने हे लक्षात ठेवावे की कोणतेही काम, मग ते लहान असो वा मोठे असो, केल्याशिवाय होत नाही.

२) भक्ति, ज्ञान, वैराग्य, योगाने व नाना साधनांनी भवरोग तुटून जातो.

३) बुद्धिमंद माणसापाशी सर्व अव्यवस्था आढळते. जगात हुशारीवाचून इतर कशालाही महत्त्व नाही.

प्र. २ प्रयत्नशील माणसांनी आपली जीवनपद्धती कशी ठेवावी असे समर्थांनी सांगितले आहे ते सात-आठ ओळीत लिहा.

प्र. ३ गाळलेल्या जागी शब्द लिहून ओवी पूर्ण लिहा.

१) अंतरीं नाहीं -----। येत्न ----- पुरता। ----- वार्ता। तेथें कैंची।।

२) जैसें ----- बोलावें। तैसेची -----। मग ----- स्वभावें। अंगीं बाणें।।

३) येथें ----- फिटली। बुद्धि येत्नीं -----। ----- वाढली। -----।।

प्र. ४ श्रीसमर्थांनी या समासांत कोणता महत्त्वाचा संदेश दिला आहे ते थोडक्यात लिहा.

प्र. ५ महंताच्या अंगी आवश्यक असणारी श्रीसमर्थांनी वर्णन केलेल्यापैकी ५ (पाच) लक्षणे सांगा.

## प्रश्नपत्रिका ८ वी

### (दासबोध दशक १२, समास १० 'उत्तमपुरुषनिरूपण'वर आधारित)

प्र. १ अ) या समासामध्ये श्रीसमर्थांनी एक प्रतिज्ञा केली आहे, ती ओवी लिहा.

ब) कीर्तिरूपाने उरण्यासाठी काय करावे, या संबंधात असलेल्या दोन ओव्या लिहा.

प्र. २ आपले बोलणे गोड का असावे, या संबंधात या समासात समर्थांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत?

प्र. ३ पुढील ओवी-चरणांचे थोडक्यात स्पष्टीकरण करा.

अ) तरतेन बुडों नेदावें। बुडतयासि।

ब) सुख पाहतां कीर्ती नाहीं।

प्र. ४ लोकप्रिय नेत्याच्या अंगी कोणता मुख्य गुण असला पाहिजे असे समर्थ म्हणतात?

प्र. ५ पुढील अर्थ ज्या ओव्यांमध्ये आहे त्या संपूर्ण ओव्या लिहा.

१) लोकांची नाना प्रकारे परीक्षा करीत असावे.

२) अन्न वाया दवडणे हा अधर्म आहे.

३) दुसऱ्यांना दुःखी करणे ही राक्षसी क्रिया.

## प्रश्नपत्रिका ९ वी

### (दासबोध दशक १८, समास ६ 'उत्तमपुरुषलक्षण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या या समासात आहेत त्या लिहा.

१) ज्या योगाने इहपरलोकांचा पैलपार गाठता येतो असा विवेक आणि योजना हे सर्व गुणांचे सार आहे.

२) धर्मस्थापना करणारे पुरुष हे ईश्वराचे अवतार असतात. ते पूर्वी होते, आज आहेत, पुढे होतील.

प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते या समासातील ओवीच्या आधारे सांगा.

१) केवळ वस्त्रालंकारामुळेच माणसाचे शरीर शोभून दिसते.

२) वेळ व प्रसंग नेहमी सारखे नसतात म्हणून एकच नियम सतत चालत नाही.

३) तुळजाभवानीची कृपा ज्याच्यावर असेल त्याने विचारपूर्वक कार्य करण्याची आवश्यकता नाही.

प्र. ३ राक्षसी वृत्तीच्या माणसाची प्रमुख लक्षणे सांगा.

प्र. ४ या समासामध्ये एखाद्या उत्तम पुरुषाचे शब्दचित्र आहे असे तुम्हाला वाटते काय? तो पुरुष कोण असावा?

प्र. ५ ओव्या पूर्ण करा.

१) ----- चि सावधाना। ----- काये ----- सूचना।

२) अति ----- वर्जावें। ----- पाहोन -----। ----- न पडावें। ----- पुरुषें।।

३) सकळकर्ता -----। तेणें ----- आंगिकारू। ----- पुरुषाचा -----। ----- जाणें।।

## प्रश्नपत्रिका १० वी

### (दासबोध दशक १९ समास १० वा 'विवेकलक्षणनिरूपण' वर आधारित)

प्र. १ या समासामध्ये समर्थ रामदासांचे व्यक्तिचित्रच जणू साकारले आहे, अशा तीन ओव्या शोधून लिहा.

प्र. २ दशक १२ समास १० मध्ये आणि या समासामध्ये एका ओवीची पहिली ओळ बहुतांशी समान आहे, ती ओवी कोणती?

प्र. ३ समर्थांच्या मठामध्ये काय चालत असे याचे वर्णन याच समासात आढळते, त्याबद्दल पाच ओळीत उत्तर द्या.

प्र. ४ थोडक्यात उत्तरे द्या.

अ) शक्यतो शक्तिवंताला अनेक प्रकारचे विचार सांगणे इष्ट का?

ब) महंताने कार्याचा व्याप वाढविताना कोणती खबरदारी घ्यावी?

प्र. ५ अ) निष्क्रियता सोडून भक्तिमार्गाचा प्रसार करावा, हे सांगणाऱ्या दोन ओव्या लिहा.

ब) दासबोधाचा प्रसार व्हावा असे आपणास का वाटते?

## प्रश्नपत्रिका ११ वी

### (दासबोध दशक १४ समास ६ वा 'चातुर्यलक्षण' वर आधारित)

प्र. १ पुढील चरणार्थ ज्यांमध्ये आहे त्या ओव्या पूर्ण लिहा.

१) अन्यायी तो दैन्यवाणा। २) तेणें आपण सुखी व्हावें। ३) पतित करावें पावन।

प्र. २ खालील विधानांचे स्पष्टीकरण या समासातील ओव्यांच्या आधारे थोडक्यात करा.

१) उत्तम गुण अभ्यासितां येती। २) तनें मनें झिजावें। तेणें भले म्हणोन घ्यावें।

प्र. ३ १) भाग्यवान आणि करंटा पुरुष यांचा उल्लेख एका ओवीतच कोठे व कसा आला आहे?

२) लोकसंग्रह का वाढवावा? तो कसा वाढविता येतो?

प्र. ४ पुढील विधानें चूक की बरोबर ते या समासातील ओव्यांच्या आधारे सांगा.

१) कामाचा व्याप वाढविला तर वैभव वाढते.

२) बाह्यरूप चांगले असेल तर अंतरंग वाईट असले तरी चालेल.

प्र. ५ १) अभ्यासार्थींना दासबोधाचा प्रसार करण्यासाठी काही 'शिदोरी' उपक्रमातून मिळाली का?

२) अभ्यासार्थींची संख्या वाढविण्याचा यत्न आपण कशा प्रकारे करता? त्यात अडचणी कोणत्या येतात?

३) सज्जनगडावरील अभ्यासार्थींच्या संमेलनामध्ये कोणत्या समस्यांची चर्चा व्हावी, असें आपणास वाटते?

## प्रश्नपत्रिका १२ वी

### (दासबोध दशक २० समास १० 'विमलब्रह्मनिरुपण'वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या या समासातील ओव्या लिहा.

१) जे दृश्याच्या आत, बाहेर तसेच ब्रह्मांडाच्या पोटातही भरलेले आहे, त्या शुद्ध ब्रह्माची सर कोणास येणार?

२) पिंड ब्रह्मांडाच्या निरसनामुळे ब्रह्मच निराभास होऊन राहाते, मग येथून तेथपर्यंतचा विस्तार भकास बनतो.

३) ब्रह्माच्या संबंधात शब्द निरर्थक ठरतात. कल्पना कल्पू म्हणू शकत नाही म्हणून कल्पनातीत ब्रह्माला जाणावयाचे असल्यास विवेक, हेच एक साधन आहे.

प्र. २ दासबोधासारख्या महान ग्रंथाच्या लेखनाचे श्रेय श्रीसमर्थांनी स्वत:कडे घेतले नाही. त्या संबंधात ते स्वत: काय उद्गार काढतात ते सविस्तर लिहा.

प्र. ३ दासबोधाचा अभ्यास करण्यासाठी साधकांना कोणत्या सूचना त्यांनी केल्या आहेत?

प्र. ४ 'अ' आणि 'ब' गटामध्ये ओव्यांचे अर्धचरण अव्यवस्थितपणे मांडले आहेत, ते नीट जुळवून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| जालें साधनाचें फळ । | कृपा केली दाशरथीने। |
| समस्तांचे मस्तकीं राहे। | आवघें दाटलें अपार। |
| आकाशाचा डोहो भरला। | माध्यानीं मार्तंड जैसा। |
| ब्रह्मासी शब्दचि लागेना। | संसार जाला सफळ। |
| कल्पना कल्पूं शकेना | कदापि नाहीं उचंबळला। |

प्र. ५ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) 'पत्रद्वारा दासबोध' या उपक्रमात यापुढेही आपण भाग घेणार का?

२) स्वाध्याय लिहिण्यासाठी समास किती वेळा वाचणे आपणास आवश्यक वाटले? प्रत्यक्ष लेखनासाठी किती वेळ लागत असे?

३) दासबोध ग्रंथ हाताशी नसताना वरील प्रश्नपत्रिका आपणास सोडवावयास दिली, तरी उत्तरे लिहू शकाल का?

४) आपण पाठविलेल्या स्वाध्यायाची प्रत आणि त्याचे परीक्षण यांची स्वतंत्र फाईल आपण ठेवली आहे का?

५) आपले सर्व स्वाध्याय (१२ स्वाध्याय) पूर्ण झाले आहेत काय?

## दासबोध परिचय : प्रश्नपत्रिका १ ली

### (दासबोध द. १८ स. ४ ''देहदुर्लभनिरूपण''वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या समासातून शोधून पूर्ण करा.

(१) देहधारी असल्यामुळेच मानवाला ग्रंथ-लेखन, लिपी परिचय इ. करता येते.

(२) देहाच्या सहाय्यानेच श्रवण, मनन खूप करून परमात्मा आपलासा करून घेता येतो.

(३) ब्रह्मांडाचे अतिविकसित फळ म्हणजे देह.

प्र. २ खालील काव्यपंक्तींचा कल्पना-विस्तार सुमारे पाच ओळीत करा.

(१) देह्याकरितां होईजे वेर्थ। आणि धन्य।। (२) देहे परलोकीचें तारूं।

प्र. ३ ''जनी जनार्दन'' पहावयास सांगणाऱ्या समर्थांनी अशा उपदेशातसुद्धा व्यवहारवाद योग्य प्रकारे प्रगट केला आहे, तो नेमका कोठे? ओव्या लिहा.

प्र. ४ सर्व समासाचा सारांश सुमारे दहा ओळीत लिहा.

## प्रश्नपत्रिका २ री

### (दासबोध द. ३ स्वगुणपरिक्षा २(अ), ३(ब), ४(क) व ५(ड) वर आधारित)

प्र. १ एका करंट्याचा जीवनवृत्तांत वरील समासामध्ये समर्थांनी कथन केला आहे. तो सुमारे पंधरा ओळीत लिहा.

प्र. २ माणसाला मातेच्या ममतेचे आणि ईश्वराच्या कृपेचे स्मरण केव्हा येते, असे वरील समासात दाखविले आहे? फक्त ओव्या लिहा.

प्र. ३ ''बालकाचे मानसशास्त्र'' समर्थांना अवगत होते, असे या समासांमध्ये कोठे दिसते? ओव्या लिहा.

प्र. ४ पुढील ओव्यांचे चरण ज्यामध्ये आहेत, त्या ओव्या संपूर्ण लिहा.

(१) जन्मवरी स्वार्थ केला। (२) म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन। (३) लेकुरें उदंड जालीं

## प्रश्नपत्रिका ३ री

### (दासबोध द. २ स. १ मूर्खलक्षण आणि द. २ स. १० पढतमूर्खलक्षण वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या लिहा.

(१) अहंमन्यतेमुळे जो सर्वांना नावें ठेवतो, तो एक पढतमूर्ख असतो.

(२) अकारण हास्य करणारा; वाजवी सल्ला न मानणारा तो एक मूर्ख असतो.

(३) स्वत: बहुश्रुत असून वाचाळ असल्यामुळे दुसऱ्याच्या वक्तव्याला कमीपणा आणतो, तो एक पढतमूर्ख असतो.

(४) मुलगा, पत्नी यांचा एक आधार मानून जो ईश्वराला विसरून जातो, तो एक मूर्ख असतो.

(५) संसाराबद्दल आस्था बाळगून, परमार्थाचा तिरस्कार करतो, तो एक पढतमूर्ख असतो.

प्र. २ पुढील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

(१) होत असतां श्रवण। देहास आलें उणेंपण। क्रोधें करी चिणचिण। तो येक पढतमूर्ख।।

(२) हस्त बांधीजे ऊर्णतंतें। लोभें मृत्य भ्रमरातें। ऐसा जो प्रपंचीं गुंते। तो येक पढतमूर्ख।।

प्र. ३ मूर्खांचे दोन प्रकार समर्थांनी सांगितले, त्या दोहोत फरक कोठे आहे?

प्र. ४ विद्यार्थ्यांसमोर बोधप्रद भाषण करताना 'मूर्ख लक्षण' समासातील कोणत्या ओव्यांचे टिपण आपणास करावेसे वाटेल; त्या ओव्या लिहा.

## प्रश्नपत्रिका ४ थी

### (दासबोध द. २ मधील स. ५-रजोगुणलक्षण, ६-तमोगुणलक्षण व ७-सत्त्वगुणलक्षण यावर आधारित)

प्र. १ त्रिगुणांच्या संदर्भात माणसांचे वर्गीकरण कोणत्या प्रमुख गटात करता येते? त्रिगुणाचे निश्चित फल सांगणारी ओवी लिहा.

प्र. २ पुढील ओव्यांच्या विरुद्ध अर्थाच्या ओव्या 'सत्त्वगुण' समासातून शोधून काढा आणि लिहा.

१) भांडण लाऊन द्यावें। स्वयें कौतुक पाहावें।

२) परपीडेचा संतोष। निष्ठुरपणाचा हव्यास। संसाराचा नये त्रास। तो तमोगुण।।

प्र. ३ खाली नमुन्यात दर्शविल्याप्रमाणे स्तंभ पाहून आधारभूत ओवीचा अंक लिहा.

| क्रिया | कोणता गुण | ओवीचा आधार |
|---|---|---|
| १) संतांची पालखी येताच धाव घेऊन दर्शनास जाणे | सत्वगुण | २-७-७७ |
| २) हरिभजन करण्यात तत्पर असणे | | |
| ३) मनाविरुद्ध कांही होताच आत्महत्या करणे | | |
| ४) देवालयाचा जीर्णोद्धार करण्यासाठी धडपड करणे | | |
| ५) फळती झाडे तोडणे, देवालये भ्रष्ट करणे | | |
| ६) प्रात:स्नानाची आवड असणे. | | |
| ७) 'मी चतुर, मी ताकदवान....' अशा बढाया मारणे | | |

८) नवसपूर्ती झाली नाही म्हणून देवाची मूर्ती फोडणे

९) स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचविणे

१०) या संसाराचा शेवट कसा होईल अशी चिंता करीत बसणे

प्र. ४ प्रपंच-वासना पेटविणाऱ्या रजोगुणापासून सुटका करून घेण्याचा उपाय समर्थांनी सुचविला आहे त्या तीन ओव्या लिहा.

प्र. ५ 'युद्ध करणे' ही कृती तामसी असली तरी श्रीराम अथवा श्रीकृष्ण यांच्या त्या कृतीबद्दल त्यांना तमोगुणी म्हणता येत नाही याचे कारण काय?

## प्रश्नपत्रिका ५ वी

### (दासबोध दशक २ मधील समास ८-सद्विधानिरूपण आणि ९-विरक्तलक्षण वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्या लिहून त्यांचा संदर्भासहित अर्थ सांगा.

(१) २-८-३१ (२) २-८-१३ (३) २-९-२६

प्र. २ जे सद्गुण जोडीने सहसा आढळत नाहीत असे समर्थांना आढळले त्यांच्या १५ जोड्या लिहा.

प्र. ३ २-८-१६ ते २-८-२३ या ओव्यांच्या आधारे सद्विद्येच्या माणसाचे अंतर्बाह्य वर्णन करा.

प्र. ४ समर्थांचा विरक्त हा समाजाशी फटकून वागणारा एकान्तिक विचाराचा नसून लोकसंग्रहकर्ता नेता असतो. या विधानाची सत्यता स्पष्ट करा.

प्र. ५ १) आपणांस दैनंदिनी लिहिण्याची सवय आहे का?

२) दिवसात अनुभविलेल्या बऱ्या-वाईट घटनाच त्यामध्ये आपण लिहिता की, त्यासोबत आत्मचिंतनही असते.

३) भावी काळात करावयाच्या गोष्टींची टिपणे आपण करता का?

४) दैनंदिनी लिहीत नसल्यास त्यामागील कारणे लिहा.

## प्रश्नपत्रिका ६ वी

### (दासबोध द. ११ स. १०-नि:स्पृह वर्तणूक आणि द. १५ स. २नि:स्पृहव्याप वर आधारित)

प्र. १ 'महंताने अंतरात्म्यासारखे असावें' याबद्दलचे विवरण (द. ११-१० मध्ये) कशा प्रकारे केले आहे?

प्र. २ (द. ११-१०) मध्ये समर्थांचे जणू आत्मचरित्रच असल्याचा भास होतो, अशा पाच निवडक ओव्या लिहा.

प्र. ३ समर्थ संप्रदायाच्या प्रसारकार्यासंबंधी कोणती माहिती (द. ११-१०) मध्ये आपणास मिळते?

प्र. ४ महाराष्ट्रातील तत्कालीन जनस्थितीचे वर्णन (द. १५-२) मध्ये समर्थांनी कसे केले आहे?

प्र. ५ अ) पुढील ओव्यांचा अर्थ लिहा.(१) १५-२-१४, (२) १५-२-२८, (३) १५-२-६

ब) समर्थांचे वास्तव्य असलेल्या घळीतील त्यांच्या प्रतिमेखाली एक ओवी लिहावयाची आहे, अशी कल्पना करून (द. १५-२) मधील नेमकी कोणती ओवी आपणास निवडाविशी वाटेल. ती ओवी लिहा.

## प्रश्नपत्रिका ७ वी

### (दासबोध द. ३ मधील स. ६-आध्यात्मिक ताप, ७-आधिभौतिक ताप आणि ८-आधिदैविक ताप यांवर आधारित)

प्र. १ त्रिविध तापांची नावे सांगून त्यांच्या व्याख्या सांगणाऱ्या ओव्या लिहा.

प्र. २ पुढील तक्ता पूर्ण करा. १ ले विधान नमुन्यादाखल दिले आहे.

| अनुक्रमांक | विधान | तापाचा प्रकार | ओवी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | आजोबांचा चष्मा हरवला. | आधिभौतिक | |
| २ | उसाच्या मळ्याला दावेदाराने आग लावली. | | |
| ३ | यात्रेकरूचे धन ठगाने लुबाडले. | | |
| ४ | ऐन उमेदीमध्ये माधवराव पेशवे क्षयाने आजारी झाले. | | |
| ५ | स्वा. सावरकर यांना तुरुंगयातना सोसाव्या लागल्या. | | |
| ६ | वार्धक्यामध्ये प्रत्येकाला हा ताप होतो. | | |
| ७ | जन्मत: आंधळेपण नशिबी येणे. | | |

प्र. ३ समर्थांच्या काळातील राजकीय छळ, अपघात आणि सासुरवास निदर्शक प्रत्येकी एकेक ओवी लिहा.

प्र. ४ संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा.

''ऐसी मर्यादा लाविली देवें। म्हणौनि नीतीने वर्तावें।''

प्र. ५ गेल्या दहा वर्षात आपणास उद्वेग आणणाऱ्या एखाद्या तापाचा स्वानुभव असल्यास थोडक्यात लिहा. (वि.सू. : 'ताप' या शब्दाचा अर्थ या समासाच्या अनुरोधाने घ्यावा. ज्वराशी ह्या अर्थी नव्हे.)

## प्रश्नपत्रिका ८ वी

### (दासबोध द. ४ स. ४-पादसेवन-भक्ती, ५-अर्चनभक्ती आणि ६-वंदनभक्ती वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाचा ओवीचरण ज्यात आहे, त्या ओव्या पूर्ण लिहा.

१) साधकाने श्रद्धापूर्वक अभिवादन केले की त्याच्या हिताची चिंता साधूला लागते.

२) पूजासाहित्य आपणापाशी आहे असे मनाने कल्पून ते भगवंताच्या चरणी अर्पण करावे.

३) शास्त्र, गुरु आणि आत्मप्रचिती या विविध कसोट्या लावून आपण तेच ब्रह्म व्हावे.

४) राने, बागा, तापसी लोकांसाठी पर्णकुटिका निर्माण करणे ही जगन्नायकाची पूजा त्याला अर्पण करावी.

प्र. २ वंदनभक्ती समासामध्ये हिंदुधर्माची विशेषता जी सहिष्णुवृत्ती, तिची शिकवण कशा प्रकारे व्यक्त झाली आहे ते सांगा.

प्र. ३ सद्‌गुरुचरणी अनन्यभाव असावा हे समर्थांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे, ते का?

प्र. ४ ''नमस्कार महती'' संबंधात समर्थांनी काय म्हटले आहे?

प्र. ५ खालील विधाने चूक की बरोबर ते स्पष्टीकरणासह लिहा.

१) नमस्कार आणि साष्टांग नमस्कार यात तारतम्य बाळगावे.

२) अर्चनभक्ती म्हटली की पूजासाहित्य प्रत्यक्ष रूपात हवेच.

३) आपले दैवत विशिष्ट असताना कोणत्याही देवाला नमस्कार करणे हा ढोंगीपणा आहे.

## प्रश्नपत्रिका ९ वी

### (दासबोध द. ८ स. ६-दुश्चीतनिरूपण वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या पूर्ण लिहा.

१) दुश्चितपणाच्या सोबतीला आळस असेल तर माणसाच्या निद्राविलासाला काय तोटा?

२) दुश्चित माणसाचा संसार एखाद्या वेड्या पिसाटाच्या संसारासारखा किंवा आंधळ्या, मुक्या, बहिऱ्या माणसासारखा होतो.

३) जो सावध, यत्नशील आणि दक्ष असेल त्याला मोक्षश्री सहजपणे प्राप्त होते.

प्र. २ दुश्चितपणाच्या प्रभावामुळे प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही आघाड्यांवर होणाऱ्या हानीची कल्पना देणारे तुमच्या दृष्टीने महत्त्वाचे चार मुद्दे सांगा.

प्र. ३ संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

१) लोहो परीसेसीं लागला। थेंबुटा सागरी मिळाला।।

२) दुश्चीत बैसलासि दिसे। परी तो असतचि नसे।।

प्र. ४ आळसाला उसंत नाही या एरव्ही विरोधाभासासारख्या वाटणाऱ्या गोष्टीतील सत्य समर्थांनी कसे उकलून दाखविले आहे?

प्र. ५ अर्थांतर न पाहाता नुसतेच श्रवण करणाऱ्यांना समर्थांनी प्रथम कशाची उपमा दिली आहे? ती उपमासुद्धा कमी पडते हे त्यांनीच कसे दाखवून दिले आहे

## प्रश्नपत्रिका १० वी

### (दासबोध द. ११ स. ५-राजकारण निरूपण आणि द. १९ स. ९-राजकारण निरूपण वर आधारित)

प्र. १ समर्थांच्या जीवनविषयक चतु:सूत्रीमधील राजकारणाचा क्रम सांगणारी ओवी लिहा.

प्र. २ दासबोधातील ओव्यांचे आधारेच, राजकारण कसे असावे आणि कसे नसावे ते स्पष्ट करा.

प्र. ३ समुदायाच्या हव्यासासाठी एकांतसेवन आवश्यक असते, हे प्रमेय समर्थांनी कसे मांडले आहे?

प्र. ४ ''येक मिरासी साधिती। येक सीध्या गवाविती। व्यापकपणाची स्थिती। ऐसी आहे।'' या ओवीचा अर्थ पाच ओळीत स्पष्ट करा.

प्र. ५ समर्थ रामदास हे केवळ भक्तिमार्गी होते की राजकारणी महंत होते? की या दोहोंपेक्षा वेगळेच त्यांचे व्यक्तिमत्व होते? आपणास या संबंधात काय वाटते, ते लिहा.

## प्रश्नपत्रिका ११ वी

### (द. १८ स. ७-जनस्वभाव निरूपण आणि १८ स. ८-अंतर्देव निरूपण वर आधारित)

प्र. १ पुढील ओव्यांचा अर्थ लिहा.

(१) १८-७-६ (२) १८-७-२० (३) १८-८-१६ (४) १८-८-२०

प्र. २ ''द. १८-७ मध्ये मानवाच्या पारलौकिक कल्याणाइतकाच ऐहिक कल्याणाचा विचार प्रभावीपणे मांडलेला दिसतो'' या विधानाची सत्यता दहा ओळीत स्पष्ट करा.

प्र. ३ तीर्थयात्रेपेक्षा सत्संगाची महति अधिक असल्याचा विचार द. १८-८ मध्ये कशाप्रकारे मांडण्यात आला आहे? (१० ओळी)

प्र. ४ ''खरा देव कोणता'' याबद्दल द. १८-८ मध्ये श्रीसमर्थांनी व्यक्त केलेले विचार लिहा.

प्र. ५ ज्या ओव्यांचे तक्ते करून ठेवावेत अशा तीन ओव्यांची निवड द. १८-७ मधून करा. याच ओव्या आपणास का निवडाव्याशा वाटल्या ते लिहा.

# प्रश्नपत्रिका १२ वी

## (दासबोध दशक ९ समास ४ ''जाणपणनिरुपण'' वर आधारित)

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या वरील समासात आहेत त्या शोधून काढा.

(१) प्रपंच असो वा परमार्थ असो, जाणता मनुष्यच त्यात यश मिळविण्यास पात्र ठरतो. नेणता हा व्यर्थ जिणे जगतो.

(२) उत्तम गुण हेच भाग्याचे लक्षण असते. हे लक्षण नसेल; तो अवलक्षणी हे सरळच आहे.

(३) ज्ञान न मिळविता करोडो साधने परोपरीने केली तरी माणसाला मोक्षाचा अधिकारी होता येणार नाही.

प्र. २ काही लोक संपन्न तर काही दुबळे, काही स्वच्छ तर काही ओंगळ, हा भेद समर्थांच्या मते का दिसतो? मनुष्य भाग्यहीन होण्याची मीमांसा समर्थांनी कशी केली आहे?

प्र. ३ 'व्याप तितका संताप' ही म्हण समर्थांना मान्य आहे का? ओवीच्या आधारे उत्तर लिहा.

प्र. ४ अज्ञानामुळे माणसांची होणारी हानी ओवी क्र. २० ते २३ अखेर कशी वर्णन केली आहे?

प्र. ५ (अ) दासबोध वाचनासाठी दैनंदिन जीवनातला किती वेळ आपण देऊ शकता? स्वतंत्र वहीत आपण टिपणे काढता का?

(ब) आपला स्वभाव आणि वर्तन यामध्ये दासबोधातील विचारांमुळे काही बदल होत आहे असे आपणास वाटते का?

(क) 'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' या उपक्रमामुळे समर्थांचे विचार समजावून घेण्यास आपणास साहाय्य मिळाले का?

(ड) आपल्या या उपक्रमाचा तसेच दासबोध ग्रंथाचा प्रसार वाढावा, यासाठी आपण स्वत: कोणत्या प्रकारे यत्न करू शकाल?

(उ) समर्थांची जी क्षेत्रे आहेत त्यापैकी कोठे आपण स्वत: जाऊन आला आहात?

(फ) दासबोध अभ्यास वर्गात आपण भाग घेतला आहे का?

(ग) आपले सर्व स्वाध्याय (१२ स्वाध्याय) पूर्ण झालेत का? 'दासबोध प्रबोध' हा पुढील अभ्यासक्रम आपण पूर्ण करणार का?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका १ ली

**(द. १-१ ग्रंथारंभलक्षण आणि द. २०-१० विमळब्रह्मनिरूपण वर आधारित)**

प्र. १ (अ) ज्या एकाच ओवीमध्ये दासबोध ग्रंथाचा सारांश सांगितला आहे, ती ओवी लिहा.

(ब) द. १-१ मध्ये कोणते विषय नि:संशयपणाने वर्णिले असल्याचे श्रीसमर्थांनी म्हटले आहे?

प्र. २ क्षूद्रवृत्तीच्या टीकाकाराची भूमिका कशी असते? या भूमिकेतून वाचकाने ग्रंथ वाचू नये; हे कशा प्रकारे स्पष्ट केले आहे?

प्र. ३ ''द. २०-१० मध्ये दासबोधातील तत्त्वज्ञानाचा सारांश ओतला आहे'' या विधानाची सत्यता प्रतिपादन करा.

प्र. ४ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) आता श्रवण केलियाचें फळ। (१-१-२८)

२) जालें साधनाचें फळ। (२०-१०-२६)

प्र. ५ (अ) दासबोधाचा अभ्यास कशा पद्धतीने करावा याबद्दल द. २०-१०-३१ आणि ३२ या ओव्यांमध्ये श्रीसमर्थांनी स्वत:च मार्गदर्शन कशाप्रकारे केले आहे?

(ब) मनाचे श्लोक, करुणाष्टके, दासबोध यापैकी काही भाग आपण दैनंदिन उपासनेच्या पद्धतीने म्हणता का?

# प्रश्नपत्रिका २ री

**(द. ११-६, महंत लक्षण, १४-१ निस्पृह लक्षण, १८-३ निस्पृहसिकवण वर आधारित)**

प्र. १ (१) महंताचे अक्षर, बोलणे, चालणे इ. कसे असावे याबद्दलची ओवी लिहा.

(२) श्रीसमर्थांनी स्वत:च्याच बोलण्याबद्दल ज्या ओवीत स्वत:च अभिप्राय लिहिला आहे ती ओवी लिहा.

(३) मानवी देह दुर्लभ आहे, विवेकाने तो सार्थकी लावावा अशा अर्थाची ओवी लिहा.

प्र. २ प्रभु रामचंद्राच्या कोणत्या गुणांचा निर्देश द. ११-६ मध्ये केला आहे? आणि तो कोणत्या संदर्भात आहे?

प्र. ३ लोकांचे मनोगत राखण्यासाठी निस्पृहाला अनेक पथ्ये सांभाळावी लागतात. एकान्तिकता नको, हे सांगणाऱ्या ५ ओव्या लिहा.

प्र. ४ निस्पृहसिकवण (द. १८-३) मधील ओवी क्र. १२ पासून २० पर्यंतच्या ओव्यांच्या अर्थाचा सारांश लिहा.

प्र. ५ श्रीसमर्थांच्या सान्निध्यातील पाच महंतांची नावे सांगून त्यांच्या मठांची गावे सांगा.

(महंतांमध्ये स्त्रियांचाही समावेश होतो)

## प्रश्नपत्रिका ३ री

**(द. १४-६ चातुर्यलक्षण, १५-१ चातुर्यलक्षण, १५-६ चातुर्यविवरण; वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ सांगा.

(१) पीतापासून कृष्ण जालें। १५-६-१

(२) समजले आणि वर्तले। १४-६-२५

(३) भेटभेटों उरी राखणें। १५-१-३५

प्र. २ कल्पना-विस्तार करा.

(१) १४-६-२३ (२) १५-१-२१ (३) १५-६-८

प्र. ३ लेखनक्रियेची महति श्रीसमर्थांनी द. १५-६ मध्ये प्रारंभीच्या पाच ओव्यात कशी सांगितली आहे?

प्र. ४ टिपणे द्या.

(१) रेखा तितुकी पुसोनि जाते। (२) पडी घेऊन उलथावें।

प्र. ५ ''माणसाने चातुर्याने दिग्विजय संपादन करावा'' असे सांगताना श्रीसमर्थांनी कोणती पथ्ये सुचविली आहेत आणि कोणते मार्ग दाखविले आहेत ?

## प्रश्नपत्रिका ४ थी

**(श्रवणमाहात्म्य : द. ७-८-श्रवणनिरूपण, ७-९-श्रवणनिरूपण,**
**१७-३-श्रवणनिरूपण वर आधारित)**

प्र. १ द. १७-३ मध्ये पहिल्याच ओवीत ग्रंथ सोडण्यापूर्वी कोणती तयारी करावी असे समर्थांनी सांगितले आहे?

प्र. २ श्रवणापासून कोणते लाभ होतात? दहा लक्षणे लिहा. (द. ७-८)

प्र. ३ ज्ञानी साधकाला अद्वैत ग्रंथ-श्रवणच पाहिजे हा विचार समर्थांनी द. ७-९ मधील तीन चार ओव्यात मांडला आहे. त्या ओव्या लिहा.

प्र. ४ येकांती नाजुक कारबार। तेथें असावे अति तत्पर। त्याच्या कोटि गुणें विचार। अध्यात्म ग्रंथीं।। या ओवीचे ७-८ ओळीत स्पष्टीकरण करा.

प्र. ५ १) तुम्ही आतापर्यंत ऐकलेल्या पाच प्रभावी प्रवचनकारांची नावे लिहा.

२) त्यांनी केलेल्या प्रवचनातील कोणत्या विशिष्ट विचारांचा ठसा आपल्यावर उमटला?

३) श्रीसमर्थांची चांगल्या ग्रंथाची लक्षणे सांगा.

## प्रश्नपत्रिका ५ वी

**(द. १६-९ नाना उपासनानिरूपण, १६-१० गुणभूतनिरूपण,**

**१७-५ अजपानिरूपण, वर आधारित)**

प्र. १ जगामध्ये नाना लोक, नाना देवतांची उपासना करतात पण ती एका अंतरात्म्यालाच पावते हे श्रीसमर्थांनी कसे सिद्ध केले आहे?

प्र. २ अंतरात्मा (किंवा आत्माराम) रूपी जगदीशाची महति द. १६-१० मध्ये कशा प्रकारे वर्णन केली आहे?

प्र. ३ 'अजपानिरूपण' समासामध्ये साधना करण्याची एक पद्धती समर्थांनी सुचविली आहे; ती कोणती?

प्र. ४ पुढील ओव्यांचा अर्थ संदर्भासहित स्पष्ट करा.

१) लक्ष्मीमध्यें करंटा नांदे। त्याचें दरिद्र आधीक सांदे। नवल केलें परमानंदें। परमपुरुषें।।

२) न्याय आणी अन्याय। होये आणी न होये। विवेकेविण काये। उमजों जाणें।।

प्र. ५ १) प्रश्नपत्रिका हाती पडल्यापासून पंधरवड्याचे आत आपला स्वाध्याय पाठविण्याचा संकल्प असतो का? त्याप्रमाणे वेळेचे नियोजन आपण करता का?

२) प्रबोध स्तराचे अन्य अभ्यासार्थी आपणास परिचित आहेत का? असल्यास त्यांच्याबरोबर प्रश्नपत्रिकेबद्दल विचारविनिमय होतो का?

३) आपल्या गावी 'दासबोध अभ्यास मंडळ' आहे का? असल्यास त्याचे कार्य कसे चालते?

## प्रश्नपत्रिका ६ वी

**(द. ५-७-बद्धलक्षण, ५-८-मुमुक्षुलक्षण आणि ५-९-साधकलक्षणनिरूपण वर आधारित)**

प्र. १. द. ५-७ मध्ये माणसांचे कोणते चार वर्ग श्रीसमर्थांनी सांगितले आहेत?

प्र. २. बद्धाचा मुमुक्षु होण्याचे परिवर्तन कोणत्या विविध कारणांमुळे होऊ शकते? आपले यासंबंधात स्वत:चे काही निरीक्षण आहे का? 'मुमुक्षुलक्षण' समासातील ओवी क्र. ६, क्र. २० आणि क्र. ४१ यांचा अर्थ स्पष्ट करा.

प्र. ३. द. ५-७ बद्धलक्षण निरूपणातील ३५ ते ४० पर्यंतच्या ओव्यात कोणती लक्षणे वर्णिली आहेत?

प्र. ४. साधकावस्थेतील प्राथमिक अवस्था द. ५-९ मध्ये कशी मांडली आहे?

प्र. ५. एखाद्या वीरपुरुषाच्या पराक्रमाप्रमाणे साधकाचे वर्णन आले आहे. अशा कोणत्याही ५ ओव्या लिहा. अशा प्रकारचे वर्णन एकंदर किती ओव्यांमध्ये आले आहे?

## प्रश्नपत्रिका ७ वी

**(द. ४-७ दास्यभक्ती, ४-८ सख्यभक्ती, ४-९ आत्मनिवेदनभक्ति वर आधारित)**

प्र. १ ''दास्यभक्ती'' आणि ''सख्यभक्ती'' यांच्या व्याख्या ज्या ओव्यांमध्ये आल्या आहेत त्या ओव्या लिहा.

प्र. २ ''नाना रचना जीर्ण जर्जर। त्याचें करावें जीर्णोद्धार।।'' या ओवीच्या स्पष्टीकरणार्थ द. ४-७ मध्ये कोणता तपशील सांगितला आहे?

प्र. ३ ''सख्यभक्ती'' संबंधातील खालील ओव्यांचा अर्थ सांगा.

(१) ४-८-४ (२) ४-८-१२ (३) ४-८-३०

प्र. ४ खालील कल्पना ज्यात आहेत त्या ओव्या लिहा.

१) देवापासून जो विभक्त नसतो तोच भक्त.

२) आत्मनिवेदन ही सर्वात श्रेष्ठ भक्ती होय.

प्र. ५ अ) मुक्तीचे चार प्रकार अध्यात्मशास्त्रात वर्णन केले आहेत. त्यांच्या संबंधात ४-९-२६ ते २९ पर्यंत कोणती माहिती दिली आहे?

ब) नवविधाभक्ती म्हणजे काय? त्यातील भक्तीचा कोणता प्रकार आपणास सुलभ वाटतो? एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात आपला प्रवेश होऊ शकतो का?

## प्रश्नपत्रिका ८ वी

**(द. १-९ परमार्थस्तवन, १३-७ प्रत्ययेविवरण, १९-७ येत्ननिरूपण वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) अनंत जन्मींचें पुण्य जोडे। (१-९-२४)

२) कर्तयासी वोळखावें। (१३-७-२९)

३) अभ्यासें प्रगट व्हावें। (१९-७-१७)

प्र. २ श्रीसमर्थांनी परमार्थाची महति द. १-९ मध्ये वर्णन केली आहे, तिच्यामधील काही निवडक मुद्दे दहा ओळीत लिहा.

प्र. ३ खालील ओव्यांचा कल्पनाविस्तार करा.

१) विचारें प्रकृति संव्हारे। दृष्य अस्तांच वोसरे। (१३-७-१२)

२) अवघेच नष्ट; येकला भला-। काशावरूनी। (१९-७-१३)

प्र. ४ जनप्रबोधन करणाऱ्या महंताना खाली दिलेल्या ओव्यात कोणती सूत्रे सांगितली आहेत?

(अ) १९-७-६ (ब) १९-७-८ (क) १९-७-११

प्र. ५ (अ) या महिन्याच्या स्वाध्यायासाठी निवडण्यात आलेल्या समासांपैकी एकावर सुमारे पंधरा मिनिटे विवरण करावयास सांगितले तर आपली तयारी आहे का?

(ब) वरीलपैकी कोणत्या समासाची निवड त्यासाठी कराल? त्यातील पाच मुद्दे एकेका वाक्यात लिहा. किंवा

(ब) वरील तीन समासात सुभाषितवजा ज्या ओव्या आहेत, असे आपणास वाटते अशा तीन ओव्या लिहा.

## प्रश्नपत्रिका ९ वी

**(द.१२-४ विवेकवैराग्यनिरूपण, १२-५ आत्मनिवेदन, १३-१ आत्मानात्मविवेक वर आधारित)**

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या लिहा.

(१) विवेकाने 'मी'पणा आणि वैराग्याने प्रपंचाची आसक्ती सुटते, अशा प्रकारे बंधनमुक्त होतो तोच नि:संग योगी.

(२) वारा नसताना आकाश जसे केवळपणाने राहाते त्याप्रमाणे अष्टदेहांचे निरसन झाल्यावर दाट परब्रह्म उरते, याचा अनुभव पहावा.

(३) अगदी मुंगीपासून ब्रह्मादि देवांपर्यंत सगळे देहधारी आहेत.

प्र. २ संदर्भासह खालील ओव्यांचे स्पष्टीकरण करा.

(अ) तिहींप्रकारें आपण। नाहीं नाहीं दुजेपण।। १२-५-२१

(ब) येकेंवीण येक काये। कामा नये वायां जाये।। १३-१-२२

प्र. ३ ''वैराग्याच्या अभावी विवेक पांगळा होतो तर विवेकाच्या अभावी वैराग्य दुराग्रही असते.'' या विधानाचे स्पष्टीकरण द. १२-४ च्या आधाराने करा.

प्र. ४ (द. १३-१-५ ते २० या ओव्यांच्या आधारे) शरीराच्या संसर्गाने आत्मा कोणत्या क्रिया करतो; त्यांचे वर्णन करा.

प्र. ५ द. १२-४ मध्यें श्रीसमर्थांचे जणू स्वत:चेच प्रतिबिंब आपणास आढळते, अशा दोन ओव्या लिहा.

## प्रश्नपत्रिका १० वी

**(द. १-४ सद्‌गुरुस्तवन, १-५ संतस्तवन, ८-९ सिद्धलक्षण वर आधारित)**

प्र. १ अर्थ स्पष्ट करा. (१) आदित्ये अंधकार निवारे। (१-४-१०) (२) जो बोलकेपणें विशेष। (१-५-११) (३) सकळ धर्मांमध्ये धर्म। (८-९-५४)

प्र. २ सद्‌गुरुस्तवन करताना कोणते दृष्टान्त दिले आहेत आणि ते तोकडे पडतात हे कसे स्पष्ट केले आहे? ओवी क्र. १-४-१५ ते २५ च्या आधारे उत्तर लिहा.

प्र. ३ वाणी आणि बुद्धी या शक्तींच्या पलीकडे आत्मवस्तू आहे, हे १-५-९ ते १२ पर्यंत कसे सांगितले आहे?

प्र. ४ संतमहिमा वर्णन करणाऱ्या निवडक ३ ओव्या लिहा.

प्र. ५ सिद्धावस्थेमध्ये प्राप्त होणारी निर्भयता, नि:स्पृहता आणि नि:संदेहावस्था लो. टिळकांच्या चरित्रातील कोणत्या प्रसंगात आपणास विशेषत्वाने प्रत्ययास येते! तो प्रसंग थोडक्यात सांगा.

## प्रश्नपत्रिका ११ वी

**(द. १८-५ करंटपरीक्षानिरूपण, १९-३ करंटलक्षणनिरूपण,**

**१९-४ सदेव (भाग्यवान)लक्षणनिरूपण वर आधारित)**

प्र. १ खालील अर्थांच्या ओव्या लिहा.

१) फडणीसीचे लक्षण; म्हणजे कालापव्यय न करणे.

२) असत्य म्हणजे पाप, सत्य म्हणजे स्वरूप.

३) पापामुळे दारिद्र्य व दारिद्र्यामुळे पाप सांचते.

४) बहुतांची अंतरे राखली तरच भाग्य येते.

प्र. २ टिपणे लिहा. (कोणतेही दोन)

१) आळसामुळे कोणती हानी होते?

२) दुश्चीत आळसाची रोकडी प्रचीति कोणती?

३) अवघेचि सुखी असावे। ऐसी वासना।

प्र. ३ सदेवाची दहा लक्षणे लिहा.

प्र. ४ प्रत्ययाचे महत्त्व समर्थांनी 'पसेवरी वैरण घातले' इ. ओव्यांनी समजून दिले आहे. त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करा.

प्र. ५ अध्यात्मिक ग्रंथांची केवळ पारायणे करणे अयोग्य आहे, हे श्रीसमर्थांनी कशाप्रकारे समजाऊन दिले आहे?

## प्रश्नपत्रिका १२ वी

**(द. २०-४ आत्मानिरूपण, २०-५ चत्वारजिनसनिरूपण, २०-८ देहेक्षेत्रनिरूपण वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) प्रगट रामाचें निशाण। २०-४-१४

२) नर तोचि नारायण। २०-५-२८

३) आवहन विसर्जन। हेंचि भजनाचें लक्षण। २०-८-३०

प्र. २ 'मानवी शरीर' यंत्राचा गौरव श्रीसमर्थांनी द. २०-८ मध्ये कशा प्रकारे केला आहे?

प्र. ३ (अ) विश्वरचनेमधील चार घटक २०-५-१ या ओवीत कसे स्पष्ट केले आहेत?

(ब) 'सामर्थ्य आहे चळवळीचें।' या ओवीचा कल्पनाविस्तार करा.

प्र. ४ द. २०-४-५ मध्ये मातेची महती कशी प्रगट झाली आहे?

प्र. ५ (अ) ''पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें। तितुकीं भगवंताचीं घरें।'' याची अनुभूती आली तर दैनंदिन वागण्यात माणसाचे वर्तनात बदल होईल काय?

(ब) प.दा.अ. उपक्रमामुळे 'समर्थ-विचार' समजाऊन घेण्यास आपणास साहाय्य मिळाले का?

(क) दासबोध अभ्यास वर्गाला आपण गेला होतात का? असल्यास केव्हा व कोठे?

(ड) आपल्या या उपक्रमाचा तसेच दासबोध ग्रंथाचा प्रसार वाढावा यासाठी आपण कोणत्या प्रकारे यत्न करू शकाल?

(इ) सार्थ दासबोध आपणाकडे आहे का? 'सज्जनगड' मासिकाचे आपण ग्राहक आहात का?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या जीवनातील ठळक घटना

| अनु. | इ. स. | घटना |
|---|---|---|
| १ | १६०८ | चैत्र शुद्ध नवमीस, जालना जिल्ह्यातील जांब गावी नारायणाचा (समर्थांचा) जन्म. |
| २ | १६१६ | बालपणीच समर्थांना रामरायाने दर्शन व अनुग्रह दिला. |
| ३ | १६२० | विवाहाच्या बोहल्यावर ''सावधान'' शब्द ऐकताच, पळून जाऊन नाशिकजवळ टाकळी येथे १२ वर्षे तपश्चर्येस सुरुवात. रामोपासना व आतून श्रीहनुमंताचे साक्षात मार्गदर्शन अशी उपासना फळास आली. |
| ४ | १६३० | छत्रपती शिवाजीमहाराजांचा शिवनेरी किल्ल्यावर जन्म. |
| ५ | १६३१ | समर्थ रामदास व शहाजीराजे यांची टाकळी येथे भेट. |
| ६ | १६३२ | टाकळी येथे तपश्चर्या पूर्ण करून भारत प्रवास आरंभ |
| ७ | १६४४ | बारा वर्षात हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पायी भारत प्रवास पूर्ण. |
| ८ | १६४५ | महाबळेश्वर येथे आगमन. |
| ९ | १६४८ | अंगापूरच्या डोहात सापडलेल्या राममूर्तीची चाफळ येथे स्थापना. (अंगापूर, ता. सातारा, जि. सातारा.) |
| १० | १६४९ | समर्थ रामदास व संत तुकाराम यांची चिंचवड येथे भेट. |
| ११ | १६४९ | चाफळला समर्थ रामदास व शिवाजीराजे यांची सिंघणवाडीस पहिली भेट. |
| १२ | १६५० | चाफळला रामनवमीचा मोठा उत्सव पार पडला. |
| १३ | १६५४ | शिवरथरघळीत दासबोध लेखनास प्रारंभ. |
| १४ | १६५५ | श्रीसमर्थांच्या मातोश्री राणूबाई यांचे जांब येथे निर्याण. |
| १५ | १६५६ | शिवथरघळीजवळच चंद्रराव मोरेला शिवाजी महाराजांनी ठार केले. |
| १६ | १६५६ | शिवाजी महाराजांनी समर्थांच्या झोळीत राज्य टाकले. |
| १७ | १६५९ | पंढरपूरला पांडूरंगाने रामरुपाने समर्थांना दर्शन दिले. |
| १८ | १६५९ | अफजलखानाचा शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर वध केला. |
| १९ | १६६३ | जेजुरी येथे खंडोबाच्या रुपाने रामाने समर्थांना दर्शन दिले. |
| २० | १६७४ | छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्यभिषेक. |
| २१ | १६७६ | छ. शिवाजीच्या विनंतीवरुन समर्थ सज्जनगडावर समर्थचरणी देह ठेवला. |
| २२ | १६७९ | संत वेण्णास्वामींनी किर्तन करता करता सज्जनगडावर कायम राहण्यास आले. |
| २३ | १६८० | रायगडावर छत्रपती शिवाजीमहाराजांचे महानिर्याण. |
| २४ | १६८१ | तंजावरहून राम, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्तींचे सज्जनगडावर आगमन व स्थापना. |
| २५ | १६८२ | पूर्वसूचना देऊन सज्जनगडावरच मठात समर्थांनी देह ठेवला. |

# 'श्री. दा. अ.' अभ्यासार्थींसाठी काही आवश्यक माहिती

श्रीसमर्थांनी अकराशे मठ भारताच्या निरनिराळ्या भागात स्थापन केले होते. हजारो महंत त्यांनी निर्माण केले आणि शिष्य-प्रशिष्यांच्या सहाय्याने समाजामध्ये प्रचंड संघटन घडवून तेजस्वी नवविचाराने समाज जागृत केला. श्रीशिवछत्रपतींना त्या जनप्रबोधनाचा उपयोग स्वराज्यस्थापनेच्या कार्यात खचितच झाला असेल.

शिव-समर्थांच्या पश्चातही सुमारे तीस वर्षे त्यांचे तेज सर्वत्र पसरले होते. सूर्यास्तानंतर जसा काही काळ प्रकाश मागे रेंगाळतो, तसा तो प्रकार होता. त्यानंतर मात्र समर्थ संप्रदायाला अवकळा आली ती विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ! त्यानंतर दासबोध ग्रंथ मुद्रित स्वरूपात बाहेर पडला. कै. शंकरराव देव यांनी समर्थांचे वाङ्मय जतन करणे व प्रकाशित करणे यासाठी 'श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर' ही संस्था धुळे येथे काढली. लोकांच्या श्रवणात आणि वाचनात 'समर्थ विचार' येऊ लागले.

सज्जनगड, चाफळ ही देवस्थाने नीट जतन व्हावीत म्हणून श्रीशिवाजी महाराजांनी जमिनी देऊन तरतूद करून ठेवली होती. देवस्थानाची ही आबाळ नष्ट व्हावी म्हणून 'श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड' या संस्थेची स्थापना स.भ. श्रीधरस्वामी (१९०८-१९७३) यांच्या प्रेरणेने इ.स. १९५० मध्ये करण्यात आली. या कार्यासाठी कै. बाबूराव वैद्य (१८९९-१९५८), कै. माधवराव हिरळीकर (१९०२-१९६५) व कै. दत्तोपंत परांजपे (१८९४-१९८२) यांचे योगदान फार मोलाचे ठरले. यथासमय चाफळ, शिवथरघळ येथेही जीर्णोद्धार कार्ये झाली, पण केवळ वास्तूंचा व तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करण्याने हे कार्य पूर्ण होणार नव्हते. लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये समर्थ रामदासांच्या विचारांचा स्पर्श करण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणे अगत्याचे होते.

'सज्जनगड' मासिकाचे प्रकाशन ही त्या दृष्टीने महत्त्वाची घटना होय. या मासिकामुळे श्रीसमर्थांचा उपदेश, त्यांचे चरित्र आणि त्याचबरोबर श्रीसमर्थ संप्रदाय आणि अन्य संप्रदाय याबद्दलचे विपुल वाङ्मय प्रसिद्ध होऊ लागले. श्रीसमर्थांच्या पादुकांचा दौराही देशभर होऊ लागला. त्यामुळे वाङ्मय प्रसारही होऊ लागला. सज्जनगड मासिकासाठी जसे कै. आण्णाबुवा कालगांवकर (१९०३-१९९९) यांनी चिकाटीने कार्य केले, त्याचप्रमाणे श्री. मारुतीबुवा भोसले रामदासी यांनी प्रचार दौरे काढण्याचे यशस्वी तंत्र हस्तगत केले.

समर्थ-विचार प्रसारांची केवळ लाट येऊन ती विरून जाता कामा नये, तर लोकांच्या अभ्यासाचाच तो एक विषय बनला पाहिजे. या दृष्टीने जे प्रयत्न झाले त्यातच दासबोध अभ्यास वर्गाचे संचालन ही महत्त्वाची घटना होय. आजवर जो ग्रंथ निव्वळ सोवळ्यात ठेवून त्याची केवळ पारायणेच होत राहीली होती, त्या ग्रंथाचा अभ्यास व्हावा, त्यातील विचारांबद्दल चर्चा व्हावी यासाठी शिवथरघळीमध्ये दा. अ. वर्गाचे संचालन कै. धों. वा. तथा आप्पा वैद्य (१९०३-१९९६) यांनी अनेक वर्षे निष्ठेने व चिकाटीने केले.

श्रीसमर्थांच्या विचारातून समाजाची ऐहिक आणि पारमार्थिक उन्नती होते, पण ते विचार जनमानसात सुप्त बीजावस्थेत पडले होते त्यांचेही पुन्हा महाराष्ट्रभूमीत आरोपण होऊन आता तो अक्षय वटवृक्ष पुन्हा बहरू लागला आहे. श्रीसमर्थ सेवामंडळाचे विविध उपक्रम म्हणजे त्या वृक्षाच्या जणू पारंब्या आहेत. आपले 'श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)' उपक्रमाचे कार्य हेसुद्धा एका पारंबीप्रमाणे आहे. हजारो अभ्यासार्थी, शेकडो समीक्षक यांच्या चिकाटीच्या परिश्रमाने हा उपक्रम वर्धमान होतो आहे.

या उपक्रमातून अभ्यासार्थींना घरच्या घरी, फावल्या वेळात दासबोधाचा अभ्यास करण्याची सोय अल्पशा खर्चात होऊ शकते आहे, पण अभ्यासार्थींना अधिक मार्गदर्शन व्हावे, यासाठी त्यांनी स्वतःच दासबोध अभ्यास मंडळे गावोगावी चालविण्याची गरज आहे.

## ''क्रिया करूनी करवावी । बहुताकरवीं ।।''  ।। ११-५-१६ ।।

''श्री.दा.अ.'' उपक्रमाचे ब्रीद-वाक्य वर उद्‌धृत केले आहे. व्यक्तिगत साधनेइतकाच समर्थांचा भर जनप्रबोधनावर होता. ''सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथे भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।।'' या ओवीचा उत्तरार्ध पहिल्या भागाइतकाच महत्त्वाचा आहे. ईश्वराचे अधिष्ठान असलेली चळवळ व्यक्तीला आणि समाजालासुद्धा तारक आहे. ''आपण करावें करवावें । आपण विवरावे विवरवावे । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ।।'' असा समर्थ रामदासांचा आग्रह आहे. पण -

''विवेकें क्रिया आपुली पालटावी । अतिआदरें शुद्ध क्रिया धरावी ।।'' याप्रमाणे आपण स्वतः आचार विचाराने शुद्ध व्हावयाचे आणि मगच लोकांना तसे बनविण्याचा यत्न करावयाचा, यात सर्वांचेच कल्याण असते. या पाठ्यपुस्तकांचा उपयोग करून ''दासबोधाचा पत्रद्वारे अभ्यास'' आपण करावा आणि मग इतरांनासुद्धा तशी प्रेरणा प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार देण्याचा यत्न करावा. या छोट्या पुस्तकाचा उपयोग करून दासबोध अभ्यासवर्ग घेणे शक्य आहे. या पुस्तकाचे केवळ पारायण नको. अर्थ समजणे अगत्याचे आहे.

''श्री. दा.अ.'' उपक्रमाचा अभ्यासक्रम समर्थ रामदासांच्या खालील सहा बोधवचनांवर आधारित आहे.

**१) यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।। (श्री समर्थ हृदय पृ. १४६- श्री. शंकर श्रीकृष्ण देव ) २) या शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ।। (दा. २०-८-११) ३) आधीं तें करावें कर्म । कर्ममागें उपासना ।। (समर्थ ग्रंथ भांडार, श्री. ल. रा. पांगारकर, पृष्ठ १०६ मानपंचक ३ ओवी १) ४) आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ।। (दा. १२-१-१) ( ५) प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।।(दा. १२-१-९)  ६) विवेकाचें फळ तें सुख । (दा. १३-७-२८) हीच सहा बोधवचने मुखपृष्ठावरही दिली आहेत.**

### सामुहिक अभ्यास - दासबोध अभ्यास मंडळे

सामुहिक वाचन, चर्चा यांची आवश्यकता बुद्धीच्या वरच्या टप्प्यातील लोकांना वाटत नाही. परंतु पारमार्थिकदृष्ट्या बहुतांश सर्वजण अगदी पूर्वप्राथमिक स्तरावरच असतात. तसेच सामुहिक वाचनात नियमबद्धता येते व अनेकांच्या अनुभवातून झालेल्या चर्चेमुळे आपली जीवनदृष्टी अधिक विशाल होते. परमार्थात (जीवनाचा खरा अर्थ उलगडण्याचे दृष्टीने) हे उपयोगीच नव्हे तर उलट आवश्यक ठरते.

श्री. दा. अ. उपक्रमातील अभ्यासार्थींनी छोटी दासबोध अभ्यास मंडळे काढावी. दर आठवड्यास किंवा महिन्यातून दोनदा एकत्र जमून समासाचे वाचन करावे. प्रा. बेलसरे यांचा सार्थ दासबोध, श्री अनंतदास रामदासींचा दासबोध-प्रवेश (याचे पुनर्मुद्रण 'मोरया प्रकाशन' यांनी केले आहे) यांचेही संदर्भ पहावे. यामुळे ओव्यांचे अर्थ चांगले समजतील. सज्जनगड मासिकातही श्री. दा.अ. स्वाध्यायासंबंधी दरमहा लेख असतो, तसेच इतर लेखही चर्चा, मनन, चिंतनाला उपयुक्त असतात. अभ्यास मंडळातील सहभागामुळे स्वाध्याय सोडविणे सोपे होईल. परंतु प्रत्येकाने स्वाध्याय स्वतःच्याच शब्दात लिहावेत म्हणजे अपेक्षित असलेले स्वयंचिंतन घडेल. इतरांची नक्कल करू नये. दरवर्षी बारा स्वाध्याय पूर्ण झाल्यावर समीक्षकांकडून प्रमाणपत्रे दिली जातात त्यामुळे सात्त्विक समाधान मिळते. तीन वर्षांचा अभ्यास पूर्ण झाला की संपूर्ण दासबोध पुन्हापुन्हा क्रमवार, विषयवार वगैरे अभ्यासाची गोडी लागते. दैनंदिन जीवनातही आनंद व समाधान मिळू लागते.

**सज्जनगड मासिकाची वार्षिक वर्गणी ३०० रु. व्यवस्थापक 'सज्जनगड' मासिक, १७९, सोमवार पेठ, 'समर्थसदन', सातारा ४१५००२ येथेच पाठवावी. नवीन ग्राहकांनी म. ऑ. कूपनवर 'नवीन ग्राहक' असे लिहावे. जुन्या ग्राहकांनी आपला ग्राहक क्रमांक कूपनवर लिहून सहकार्य करावे. आपला पूर्ण पत्ता लिहावा.**

**: अधिक माहितीसाठी पुणे संपर्क :**

**श्री. विजय गाडगीळ** : मो. ९३०९८०१८०८ ऑफिस - ८६६९४०५९७१

'श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)' प्रकाशन विभाग, श्रीसमर्थ सेवामंडळ, सज्जनगड, सातारा ४१५ ०१३ यांच्या वतीने प्रकाशित.